# डॉ पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ अकोला

## कृषी विज्ञान केंद्र,

वाघापूर रोड, यवतमाळ- ४४५००१

दूरध्वनी क्र. (०७२३२) २४८२३५ email pckvkytl@yahoo.co.in

ICAR


---

जा.क्र./कृविके/यवत/शा.स.स.स./६१४/२०२४
दिनांक : ०९ .०२ .२०२४

प्रती

जिल्हा माहिती अधिकारो
जिल्हा माहिती कार्यालय, यवतमाळ

विषय : बातमी प्रसिद्ध  करणे बाबत...

महोदय :

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते कि  दि. ०३ -०२ -२०२४  रोजी २२  व्या शास्त्रीय सल्लागार समितीची सभा संपन झाली .तरी याबाबत ची बातमी आपण विविध वृतमान पत्रातून प्रसिद्धी कराव हि विनंती

**सोबत :** सविस्तर बातमी व दोन फोटो

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ

## कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ-१ (डॉ पं .दे.कृ.वि., अकोला ) आयोजित २२ वि शास्त्रीय सल्लागार समिती सभा संपन्न

# पिकाची फेरपालट करणे काळाची गरज

**— डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला**
**तथा अध्यक्ष शास्त्रीय सल्लागार समिती सभा**

कृषि विज्ञान केंद्र यवतमाळ येथे दि. **०३.०२.२०१२४** रोजी २२ व्या शास्त्रीय सल्लागार समितीची सभा सन्माननिय **डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला तथा अध्यक्ष शास्त्रीय सल्लागार समिती सभा** यांच्या अध्यक्षतेखाली व **मा. डॉ. धनराज उंदीरवाडे, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला** यांच्या प्रमुख उपस्थीतीत संपन्न झाली.

या प्रसंगी सलंग्न विभागाचे सदस्य मा. श्री. संतोष डाबरे, प्रकल्प संचालक, आत्मा, मा. डॉ. एन. डी. पार्लावार, सहयोगी अधिष्ठाता, व.ना.कृ.जै.म., यवतमाळ, मा. डॉ. विजय माने, सहयोगी अधिष्ठाता, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ, मा. डॉ. प्रमोद यादगीरवार, सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवतमाळ, मा. श्री. विलास शिंदे, रेशीम विकास अधिकारी श्रेणी—२, रेशीम विभाग, यवतमाळ, मा. श्री. विनोद देशमुख, जिल्हा व्यवस्थापक, महाबिज, यवतमाळ, मा. सौ. वैशाली रसाळ, प्रकल्प संचालक, DRDA जि. प. यवतमाळ, मा. श्री. रवी मेश्राम, प्रतिनिधी, जिल्हा मृदचाचणी मृद सर्वेक्षण अधिकारी, यवतमाळ, मा. सौ. मंगला माळवे, कृषि विभाग, आकाशवाणी, यवतमाळ, मा. श्री. महाडीक, सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, यवतमाळ, मा. श्री. अमर गजभीये, प्रबंधक, अग्रणी बॅक, यवतमाळ, मा. डॉ. प्रदिप नागापुरे, प्रतिनिधी, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, यवतमाळ, डॉ. नंदकिशोर हिरवे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृ वि के सांगवी (रेल्वे) ता. दारव्हा, श्री. पंकज बर्डे, प्रतिनिधी, जिल्हा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ, मा. डॉ. अशितोष लाटकर, प्रभारी अधिकारी, कृसंके, यवतमाळ, मा. पाटील मॅडम, प्रतिनीधी, सामाजिक वनीकरण विभाग, यवतमाळ, मा. राजेश कांबळे, आय सी आय सी आय, फाऊडेशन, यवतमाळ तथा आमंत्रीत शेतकरी बांधव श्री. सुनिलभाऊ घावडे, श्री. निलेशभाऊ टाके, श्री. हरीषभाऊ काळे, श्री. जगदीशभाऊ चव्हाण, श्री. विकास क्षिरसागर, मा. श्री. बंडूभाऊ मोहुर्ले तसेच विद्यापिठातंर्गत राबवित असलेल्या मॉडेल व्हीलेजच्या गावाचे प्रतिनिधी म्हणुन श्री. कृष्णाभाऊ ठाकरे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये मा. डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला तथा अध्यक्ष शास्त्रीय सल्लागार समिती सभा यांनी पिकाचे उत्पादन वाढीसाठी पिकाची फेरपालट करावी. तसचे आर्थिक उत्पन्ना करीता शेतकरी बांधवांनी पूरक व्यावसायाकडे वळावे व त्याकरीता वेळोवेळी शेतकरी बांधवानी कृषि विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहून मार्गदर्शन घ्यावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथीपर मार्गदर्शनामध्ये मा. डॉ. धनराज उंदीरवाडे, संचालक, विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला तथा सदस्य, शास्त्रीय सल्लागार समिती सभा यांनी खरीप व रब्बी हंगामामध्ये पिकांविषयी येणाऱ्या अडचणीं विषयी नियोजन शास्त्रीय सल्लागार समितीमार्फत केले जाते तसेच जिल्हयामध्ये कापूस पिकातील गुलाबी बोंडअळी बाबत वेळोवेळी विषय तज्ञांनी

मार्गदर्शन व विद्यापिठाचे विकसीत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहचविले जाईल यावर कार्य करावे या विषयी मार्गदर्शन केले.

मा. श्री. संतोष डाबरे, प्रकल्प संचालक, आत्मा तथा सदस्य, शास्त्रीय सल्लागार समिती सभा यांनी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक सेंद्रिय शेती मिशन अंतर्गत निर्माण झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनींना शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन करण्याचे काम कृषि विज्ञान केंद्राने करण्याकरीता सहकार्य करावे तसेच पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने आत्माअंतर्गत तयार झालेल्या बचत गटांना प्रक्रिया उद्योगाकरीता प्रोत्साहित करून वेळोवेळी मार्गदर्शन करावे अशी विनंती केली.

प्रास्ताविकपर शास्त्रीय सल्लागार समिती सभेचे सदस्य सचिव डॉ. सुरेश ऊ. नेमाडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ यांनी मागच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावर केलेल्या कार्यवाहि बद्दल माहिती दिली आणि शास्त्रीय सल्लागार समिती सभेचे महत्त्व विषद करून सदर सभा तसेच पुढील कार्यक्रमाची दिशा ठरविण्यासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे नमुद केले तसेच कृषि विज्ञान केंद्राचे विषयतज्ञ श्री. मयुर ढोले, डॉ. प्रमोद मगर, डॉ. राहुल चव्हाण, डॉ. गणेश काळुसे, प्रा. श्रीमती. स्नेहलता भागवत यांनी आपल्या विभागाचा कार्य अहवाल सादर केला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मयुर ढोले, विषय विशेषज्ञ (विस्तार शिक्षण) तर आभार डॉ. प्रमोद मगर, विषय विशेषज्ञ (किटकशास्त्र) यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख**
**कृषि विज्ञान केंद्र,यवतमाळ**